सकाळ - ०५-०१-२१.

# जबरी चोरीतील दोन आरोपींना मुद्देमालासह पोलिसांनी केली अटक

## एका महिलेचाही समावेश; आरोपींना दोन दिवसाची पोलिस कोठडी

**नांदेड, ता.३ (बातमीदार)** : धानोरा मक्ता (ता.लोहा) येथील प्रल्हाद निवृत्ती कदम यांना पकडून त्यांच्याकडून २२ हजार रुपयांचा ऐवज पळवला होता. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वजिराबाद पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अधिक माहिती अशी की, प्रल्हाद कदम हे एचडीएफसी बँकेमध्ये एक जानेवारी २०२१ रोजी पीक कर्जाची रक्कम भरण्यासाठी आले होते. यादरम्यान बसस्थानक जवळ राखोजीनगर नांदेड येथील आरोपी शेख आवेज शेख अहेमद (वय २३) आणि रेखा शेख आवेज (वय २०) यांनी त्यांना अडवून खाली पाडले. या वेळी प्रल्हाद कदम यांच्याकडील रोख २० हजार रुपये आणि दोन हजार रुपयांचा एक मोबाईल असा एकूण २२ हजार रुपये घेवून पळून गेले होते. त्यांनी वजिराबाद पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानुसार पोलिस उपनिरीक्षक अमोल पन्हाळकर तपास करत होते.

दरम्यान पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलिस अधीक्षक निलेश मोरे, उप विभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड यांनी आरोपींचा शोध घेऊन माल हस्तगत करण्याच्या सूचना वजिराबाद पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदीप शिवले यांना दिल्या होत्या. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे पोलिस अधिकारी सुनिल पुंगळे, उपनिरीक्षक शेख अब्दुल रब, दत्तराग जाधव, संजय जाधव, गजानन किडे, विजयकुमार नंदे, बबन बेडदे, चंद्रकांत बिरादार, शरदचंद्र चावरे, श्री. गंगुलवार यांनी गुप्त माहितीनुसार शेख आवेज शेख अहेमद आणि रेखा शेख आवेज यांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे चोरीला गेलेल्या मालापैकी २०० रुपयांच्या ७४ नोटा (१४ हजार ८०० रुये) मिळाल्याने त्यांना अटक केली आहे. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता दोघांनाही दिन दिवसाची पोलिस कोठडीत पाठवले आहे.